महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २२० वे | दिनांक : ०५/०८/२०२६ | वार : बुधवार

## अमित शाह-शिंदे गटाच्या खासदारांची भेट; 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा रंगली



**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे नेते खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासह पक्षाच्या इतर खासदारांनी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली असून या भेटीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, काही काळापूर्वी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला सुरुंग लावत त्यांचे सहा खासदार आपल्याकडे वळवण्यात शिंदे गटाला यश आले होते. या पार्श्वभूमीवर, दिल्लीत झालेल्या या महत्त्वपूर्ण भेटीमुळे राज्यात आता 'ऑपरेशन टायगर'चा पुढचा टप्पा सुरू होणार का, अशा राजकीय चर्चांना नव्याने उधाण आले आहे. काही काळापूर्वी घडलेल्या नाट्यमय घडामोडींमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे सहा खासदार शिंदे गटात सामील झाले होते. तेव्हापासून शिंदे गटाचे लक्ष ठाकरे गटाच्या आणखी काही आमदारांवर असून, त्यांना पक्षात आणण्यासाठी 'ऑपरेशन टायगर' राबवले जाणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. याच पार्श्वभूमीवर, सध्या सुरू असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान खासदार श्रीकांत शिंदे यांनी आपल्या पक्षाच्या इतर खासदारांसह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा विविध चर्चांना उधाण आले आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणाऱ्या नेत्यांमध्ये नरेश म्हस्के, ओमराजे निंबाळकर, नागेश पाटील आष्टीकर, संजय दीना पाटील आणि नुकतेच शिंदे गटात सामील होऊन विधानसभेचे उपसभापती झालेले सचिन अहीर यांचा समावेश होता. शिवसेनेत फूट पडल्यानंतर अमित शाह आणि शिंदे गटाच्या नेत्यांमध्ये झालेली ही दुसरी मोठी भेट आहे. मात्र, या भेटीचा सविस्तर तपशील आणि नेमके कारण अद्याप गुलदस्त्यात असल्यामुळे सध्या राजकीय वर्तुळात यावरून विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. या भेटीसंदर्भात खासदार श्रीकांत शिंदे यांनी ट्विट करत माहिती दिली आहे. त्यांनी म्हटले की, देशाचे आदरणीय गृहमंत्री अमित शाह साहेबांची आज दिल्ली येथे त्यांच्या संसदीय कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान आदरणीय गृहमंत्री महोदयांशी विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्रीय मंत्री पियुष गोयलजी, महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, खासदार श्रीरंग बारणे, नरेश म्हस्के, संजय दिना पाटील, ओम राजे निंबाळकर, नागेश पाटील आष्टीकर उपस्थित होते, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

## शेतकरी साहित्यचोरी टोळीचा पर्दाफाश; तिघे अटकेत

**पुणे :** शेतकऱ्यांच्या शेतातील ट्रॅक्टर, ट्रॉली, पिकअप वाहन, मोटार पंप तसेच इतर शेती साहित्य चोरणाऱ्या टोळीचा वालचंदनगर पोलिसांनी पर्दाफाश केला असून तीन आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून सुमारे 25 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पुणे ग्रामीण जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून शेतीसाठी वापरण्यात येणारे ट्रॅक्टर, ट्रॉली, मोटार पंप, केबल वायर आणि इतर साहित्य चोरीच्या घटना वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंदनगर पोलिसांनी विशेष तपास पथक तयार करून गुप्त माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान जयदीप नानासो घोळवे आणि त्याच्या साथीदारांकडून शेतकऱ्यांच्या ट्रॉली चोरी होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये जयदीप नानासो घोळवे (22), मेघराज नानासो आंबोसे (22) आणि आकाश विलास शिंदे (23, सर्व रा. निंबोडी, ता. इंदापूर, जि. पुणे) यांचा समावेश आहे. आरोपींकडून एक ट्रॅक्टर, ट्रॉली, पिकअप वाहन, सौर मोटार पंप तसेच चोरीसाठी वापरलेले वाहन असा एकूण सुमारे 25 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले असून आणखी काही गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, बारामती विभागाचे अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंदनगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने केली.

## तलाठी भरती आणि सीईटी परीक्षेत मोठा घोळ - रोहित पवार




**मुंबई :** स्पर्धा परीक्षा आणि सीईटी (CET) प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असून, यात मंत्री आणि अधिकारी सामील असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी शिक्षण क्षेत्रातील टेंडर घोटाळा, सीईटीमधील पर्सेंटाईल घोळ आणि व्हीआयपी मुलांना मिळणारे बोगस गुण यावर पुरावे सादर करत सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. तसेच या संपूर्ण भ्रष्टाचाराप्रकरणी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी करत, विद्यार्थ्यांच्या हितासाठी पुण्यात भव्य मोर्चा काढण्याचा इशारा त्यांनी दिला.

सीईटी आणि दहावी-बारावीच्या गुणांमधील तफावत

पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार म्हणाले की, "दहावी आणि बारावीमध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी पूर्वी सीईटीमध्येही उत्तम गुण मिळवायचे. मात्र, २०२३ नंतर यामध्ये अचानक मोठी तफावत दिसून येऊ लागली आहे. एकाच घरातील आणि एकाच केंद्रावरील मुलांना समान पर्सेंटाईल मिळणे किंवा २०० पैकी १०४ गुण मिळूनही विद्यार्थ्यांचे पर्सेंटाईल केवळ ९ येणे, हे सामान्य नाही. या प्रक्रियेत मोठा घोळ असून नॉर्मलायझेशन आणि पर्सेंटाईलच्या नावाखाली विद्यार्थ्यांची फसवणूक केली जात आहे."

राज्यात इंजिनिअरींग, फार्मसी आणि कृषी अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या MHT-CET ऑनलाईन परीक्षेतच घोळ होत असून त्याऐवजी पूर्वीप्रमाणे ऑफलाईन (OMR) परीक्षा घेणं आवश्यक आहे. MHT-CET ऑनलाईन परीक्षेत अनेक गैरप्रकार झाले असून ही परीक्षा घेणारी Edu-Spark ही कंपनी परीक्षेचं टेंडर मिळवण्यासाठी कसा गैरव्यवहार करते याची पोलखोल बिहारसह अनेक राज्यांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्याचाच हा प्रकार असून यामुळं गुणवान आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. त्यामुळं MHT-CET परीक्षेच्या निकालाचे फॉरेन्सिक ऑडीट करुन 2023 पासून सीईटी परीक्षेच्या निकालाची आणि या कंपनीला दिलेल्या सर्व टेंडरची सखोल चौकशी झाली पाहिजे. यासंदर्भात घेतलेल्या सविस्तर पत्रकार परिषदेतील प्रेझेंटेशन सोबतच्या लिंकमध्ये देत आहे. हा मुद्दा लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा असून त्याचा आम्ही अखेरपर्यंत पाठपुरावा करू...!शिक्षण विभागातील टेंडर प्रक्रियेवर ताशेरे ओढताना रोहित पवार म्हणाले की, "टीसीएस (TCS) सारख्या नामांकित कंपनीचे सर्वात कमी रकमेचे (L१) टेंडर तीनदा रद्द करून 'एडुस्पार्क' नावाच्या एकाच मालकाच्या वेगवेगळ्या मित्र कंपन्यांना कोट्यवधी रुपयांची कंत्राटे देण्यात आली. विशेष म्हणजे, याच कंपनीच्या भ्रष्टाचाराबाबत बिहार सरकारने तपास करून पंतप्रधान कार्यालयाला अहवाल पाठवला होता आणि त्यात महाराष्ट्राचाही संदर्भ आहे. असे असतानाही, राज्य सरकारने यावर कोणतीही कारवाई केली नाही. यात राज्याचे संबंधित मंत्री आणि अधिकारी थेट गुंतलेले आहेत."

लाखोंच्या वसुलीचा खेळ आणि गरिबांच्या मुलांवर अन्याय

"गरीब आई-वडील कष्टाचे पैसे गोळा करून मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करतात. मात्र, काही लाखांची ऑफर देऊन सेंटर्स मॅनेज केले जातात आणि पैशांच्या जोरावर श्रीमंतांची मुले चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळवतात. याउलट, कष्टकरी व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांच्या हाती निराशा येते. पोलीस भरतीतील बनावटगिरी असो किंवा परीक्षांमधील घोटाळे, राज्यामध्ये सध्या नेत्यांचे आणि अधिकाऱ्यांचे घर भरण्याचे काम सुरू आहे," असा घणाघात त्यांनी केला.

आगामी आंदोलनाची घोषणा आणि विविध मागण्या

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ ऑगस्ट २०२६


## कौठळी येथे आरक्षण उपवर्गीकरण विरोधी मोर्चाच्या पार्श्वभूमीवर बैठक



**कौठळी (प्रतिनिधी) :** परळी-वै. तालुक्यातील मौजे कौठळी येथे आज आरक्षण उपवर्गीकरण विरोधात परळी-वै. येथे दि.१० ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोर्चाच्या पार्श्वभूमीवर समाजबांधवांची बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत विविध मान्यवरांनी मार्गदर्शन करत समाजातील सर्व घटकांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले.यावेळी युवक नेते सचिन भाऊ कागदे, वंचितचे महासचिव मिलिंद घाडगे, मुक्ताराम नाना गवळी, राहुल भाऊ घोबाळे आणि रवी भाऊ मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी सचिन भाऊ कागदे यांनी दि.१० ऑगस्ट २०२६ रोजी परळी-वै. येथे होणारा मोर्चा यशस्वी करण्यासाठी सर्व समाजबांधवांनी एकजुटीने उपस्थित राहावे, असे आवाहन केले. तसेच उपस्थित मान्यवरांनीही समाजातील प्रत्येक घटकाने मोर्चात सहभागी होऊन आपली भूमिका ठामपणे मांडावी, असे सांगितले.कौठळी गावचे माजी सरपंच मधुकर (अण्णा) झिंजुर्डे यांनी मार्गदर्शन करताना आरक्षण उपवर्गीकरणामुळे समाजातील दोन घटकांमध्ये दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. अशा निर्णयाविरोधात समाजाने संघटितपणे लढा देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.बैठकीस माजी उपसरपंच रमेशदादा झिंजुर्डे, ग्रामपंचायत सदस्य शैलेंद्र नाना झिंजुर्डे, बंडू झिंजुर्डे, अशोक झिंजुर्डे, विष्णु झिंजुर्डे, हर्षवर्धन झिंजुर्डे, श्रीपती झिंजुर्डे, दत्तू झिंजुर्डे, वाल्मिक झिंजुर्डे, दीनानाथ हाणवते, सिद्धार्थ हाणवते, दिलीप झिंजुर्डे, राजू झिंजुर्डे, राजकुमार झिंजुर्डे, पोस्टमन चंदन झिंजुर्डे यांच्यासह युवक कार्यकर्ते रवी झिंजुर्डे, कैलास झिंजुर्डे, सुशील झिंजुर्डे, गोविंद झिंजुर्डे, राष्ट्रपाल झिंजुर्डे, स्वप्निल झिंजुर्डे, कुंदन झिंजुर्डे, सूरज हाणवते, दया झिंजुर्डे, ऋषिकेश झिंजुर्डे, सूरज झिंजुर्डे तसेच मोठ्या प्रमाणात महिला मंडळी व समाजबांधव उपस्थित होते.बैठकीच्या शेवटी गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, युवक कार्यकर्ते व महिला मंडळी यांनी आरक्षण उपवर्गीकरणाविरोधातील लढ्यात एकजुटीने सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच दि. १० ऑगस्ट रोजी परळी-वै. येथे होणाऱ्या मोर्चात कौठळी गावातून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची ग्वाही देण्यात आली.

## जायकवाडी धरणातून १० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील जायकवाडी धरणातून (नाथसागर जलाशय) आज, मंगळवार (४ ऑगस्ट) सायंकाळी गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात येणार असल्याने नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जायकवाडी धरण नियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी ५ ते ६ वाजेदरम्यान धरणाच्या सांडव्याद्वारे १० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येणार आहे.

धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून येणाऱ्या पाण्याच्या आवकेनुसार या विसर्गात आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट केली जाऊ शकते, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विसर्ग सुरू होणार असल्याने गोदावरी नदीपात्रात कोणीही प्रवेश करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, जेणेकरून कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी होणार नाही.

**गोदावरीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा**

जायकवाडी पाटबंधारे विभागाने गोदावरी नदीकाठच्या सर्व गावांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रशासनाकडून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात असून, पाण्याच्या आवकेनुसार विसर्गात बदल होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**मराठवाड्यात पावसाची प्रतीक्षा कायम, शेतकरी चिंतेत**

मराठवाड्यात पावसाची तूट अद्यापही भरून निघालेली नाही. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये कोणताही अलर्ट देण्यात आलेला नाही. येथे पुढील काही दिवस पावसाचा जोर कमीच राहणार असून, हलका पाऊस आणि ढगाळ हवामान राहील. पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे मराठवाड्यासह राज्यातील इतर काही भागांतील शेतकऱ्यांची चिंता आता वाढू लागली आहे.

## परभणी जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर तर उपाध्यक्षपदी राजेश गोरेगावकर यांची बिनविरोध निवड




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांची, तर उपाध्यक्षपदी राजेश पाटील गोरेगावकर यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोन पदांच्या निवडीसाठी सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी नवनिर्वाचित संचालक मंडळाची विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. सकाळी ११ ते ११.३० या वेळेत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारी अर्ज स्वीकारले. अध्यक्षपदासाठी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची निवड निश्चित झाली. उपाध्यक्षपदासाठी राजेश पाटील गोरेगावकर व आमदार सईद खान यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यानंतर अर्जांची छाननी प्रक्रिया पार पडून दोन्ही अर्ज वैध ठरले. मात्र, अंतिम क्षणी आमदार सईद खान यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने राजेश पाटील गोरेगावकर यांच्या उपाध्यक्षपदाच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दोघांची नावे अधिकृतपणे जाहीर केली. या बिनविरोध निवडीमुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात समाधानाचे वातावरण असून, भाजप कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. दरम्यान, पालकमंत्री सौ. मेघना साकोरे- बोर्डीकर यांनी अध्यक्ष व उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सर्व संचालक, सहकारी संस्था प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांचे आभार मानत नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.


**१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी**

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

**DMLT** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स

**PGDMLT** — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

**X-RAY** — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी ,१२ वी पास

**C.T.SCAN** — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी ,१२ वी पास

**E.C.G.** — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी ,१२ वी पास

**O.T. TECHNICIAN** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी ,१२ वी पास

**PG RADIOLOGY** — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc. Physics

**रेडिओलॉजी** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

**फिजिओथेरपी** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

**ऑप्थोमेट्री** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ ऑगस्ट २०२६


## निस्वार्थ नाते

प्रत्येकाने जपावे मनात,
मैत्रीचे अनमोल नाते.
आनंदाने मैत्रीसाठी
सारे जग गुणगान गाते. १

रक्ताच्या नात्यापलीकडे,
असते खास मैत्रीचे नाते.
प्रत्येकाच्या जीवनात,
बिनव्याजी असते खाते. २

सुख दुःखात साथ देणारा,
असते निस्वार्थ निर्मळ नाते.
दुःखात पुढे सुखात मागे,
सदैव पुढे पुढे चालत जाते. ३

जिवाभावाच्या पलीकडे,
मित्राची असते मैत्री खास,
मित्र सोबत असल्यावर,
कोणीही होत नाही उदास. ४

कितीही दूर असला तरी,
भेटीची लागते सदैव आस.
कारण जीवन जगण्यासाठी,
जीवनात मित्र असतो खास.५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी क्रांती दिनाच्या आयोजनासाठी निरगुडी बु. ठाकरवाडीत नियोजन बैठक संपन्न




**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : निरगुडी बु. येथील ठाकरवाडीत ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी क्रांती दिन उत्साहात साजरा करण्याच्या अनुषंगाने नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी क्रांती दिनानिमित्त प्रभात फेरी, समाजप्रबोधन, सांस्कृतिक कार्यक्रम, आदिवासी परंपरेचे दर्शन घडविणारे उपक्रम तसेच युवक व महिलांचा सक्रिय सहभाग वाढविण्याबाबत निर्णय घेण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन, जबाबदाऱ्या आणि आवश्यक तयारी यांचे वाटपही करण्यात आले.बैठकीत उपस्थित मान्यवरांनी आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा, शौर्य आणि अस्मिता जपत समाजात एकता व शिक्षणाचा संदेश पोहोचविण्याचे आवाहन केले. तसेच ९ ऑगस्ट रोजी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जागतिक आदिवासी क्रांती दिन उत्साहात साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.बैठकीस गावातील ज्येष्ठ नागरिक, रामचंद्र मधे, पांडुरंग मधे (उपसरपंच), गंगाराम मेंगाळ (पोलिस पाटील निरगुडी बु) खंडू भांडारे, सनिराम मेंगाळ , शिवराम मेंगाळ, लक्ष्मण मेंगाळ,लक्ष्मण मधे,किसन मेंगाळ, यशवंत पथवे,कडूबा आवाले ,श्रावण कातवारे, भाऊसाहेब बांगारे,हिरामण मधे,नागु कातवारे,गंगाराम मेंगाळ, युवक, कडूबा गांगड, बाळू मधे, बबन कातवारे,तुकाराम बांगारे, सनिराम गावंडे, तुकाराम मेंगाळ, विष्णू मधे, , नवनाथ अगिवाले,सोमनाथ मेंगाळ, सुरेश डोके,सोमिनाथ मेंगाळ, शंकर कातवारे,तुकाराम कातवारे , बंडू साळवे, सुक्राम कातवारे तसेच आदिवासी समाजातील विविध पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लेखन प्रेरणा दिनानिमित्त 'आई-बाबा' विषयावरील निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**चापानेर, ता. कन्नड** : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या लेखन प्रेरणा दिनाच्या औचित्याने श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथे "आई-बाबा" या हृदयस्पर्शी विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या लेखणीतून आई-वडिलांविषयीचे प्रेम, त्याग, संस्कार आणि कृतज्ञतेच्या भावना प्रभावीपणे व्यक्त करत स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.स्पर्धेतील उत्कृष्ट निबंध लेखनासाठी कु. स्वरा गोविंद बनकर, कु. सिद्दी अरुण पवार, कु. आराध्या गणेश घुले, कु. नंदिनी नवनाथ बनकर, कु. गायत्री बाळासाहेब दरेकर व कु. अद्विती सुभाष पवार या विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. विजेत्या विद्यार्थिनींना साई सायली बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दशरथ सोमासे तथा संचालक केतन पवार यांच्या हस्ते रोख रक्कम, ट्रॉफी व शाल देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत वाचन, लेखन आणि सृजनशील विचारांची जोपासना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, अभिव्यक्ती कौशल्य, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव विकसित होण्यास निश्चितच चालना मिळते, असे मत व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कौशल्या सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप वाकडे, वर्षा जाधव, मनीषा पवार, सुषमा मगर, दुर्गा वैष्णव, दिव्या लोखंडे, भारती पवार, शामबाला पवार, पूजा तोडावत, ममता कोल्हे, चंदा घुले आदी शिक्षकांनी तसेच शिक्षकेतर कर्मचारी अंकुश राठोड, कविता हिरे आणि राजू राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. विजेत्या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखनाची आवड, सृजनशीलता आणि संवेदनशील विचारांची जपणूक होण्यास निश्चितच प्रेरणा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ ऑगस्ट २०२६


## जिंतूरची जिल्हा परिषद शाळा बनली समाजकंटकांचा अड्डा ?




***चौकट :** एकेकाळी गुणवंत विद्यार्थ्यांना घडविणारी ही शाळा आज दुर्लक्षामुळे ओस पडली आहे. रिकाम्या वर्गखोल्यांमध्ये मद्याच्या बाटल्या व नशेच्या साहित्याचे अवशेष आढळत असल्याचा दावा नागरिकांनी केला असून, परिसर तातडीने सुरक्षित करण्याची मागणी त्यांनी केली आहे.*


**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जीर्ण जिल्हा परिषद शाळा बनली समाजकंटकांचा अड्डा; कारवाईची मागणीजिंतूर, प्रतिनिधी : जिंतूर शहरातील मध्यवर्ती भागातील जुनी जिल्हा परिषद शाळेची जीर्ण इमारत सध्या असामाजिक घटकांच्या वावरामुळे चर्चेत आली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सायंकाळनंतर या परिसरात मद्यपान, अमली पदार्थांचे सेवन तसेच संशयास्पद हालचाली होत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या इमारतीलगत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, मुलींचे निवासी वसतिगृह आणि जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ असल्याने विद्यार्थिनी, महिला शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी जीर्ण इमारत पाडून परिसर सुरक्षित करण्यासह पोलिसांनी नियमित गस्त वाढवावी आणि महिला सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.दरम्यान, या प्रकरणाची शिक्षण विभाग किती तातडीने दखल घेते, याकडे जिंतूरकरांचे लक्ष लागले आहे.

## जडीबुटी दिनानिमित्त पतंजली योग समितीतर्फे औषधी वृक्षांचे वृक्षारोपण



**जिंतूर, (बी. डी. रामपूरकर) :** पतंजली योगपीठाचे महासचिव आचार्य बालकृष्णजी यांच्या प्रकटदिनानिमित्त त्यांच्या संकल्पनेनुसार 'जडीबुटी दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने जिंतूर शहरातील साईप्रसाद नगरी येथे पतंजली योग समितीच्या वतीने यज्ञ, वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृतीचा उपक्रम राबविण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात वैदिक मंत्रोच्चारात यज्ञ करून करण्यात आली. त्यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आवळा, वड, दशपर्णी यांसारख्या औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षसंवर्धनासह आयुर्वेदाचा प्रसार आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा संदेश यावेळी उपस्थितांना देण्यात आला.कार्यक्रमात भारत स्वाभिमान परभणीचे जिल्हा प्रभारी धोंडीराम शेप, बापू देशमुख, ॲड. देशपांडे, मिडिया प्रभारी सचिन रायपत्रीवार, पुरुषोत्तम अंभुरे, निवृत्त अभियंता हरीभाऊ केंद्रे, राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची सामूहिक माहिती दिली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संतोष आंधळे, ज्ञानेश्वर चक्रवार, किशनराव वटाणे, निलंगे अप्पा तसेच योग वर्गातील विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. पर्यावरण संवर्धन, आरोग्य संवर्धन आणि आयुर्वेदाचा प्रसार या संदेश देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## ८ऑगस्ट रोजी होणार गिरीष जोशी यांच्या "मी दिवा विझवला नाही" या गझलसंग्रहाचे प्रकाशन



**छत्रपती संभाजीनगर :** मराठी गझलविश्वातील संवेदनशील अभिव्यक्तीला नवा चेहरा देणाऱ्या गझलकार गिरीश जोशी यांच्या 'मी दिवा विझवला नाही' या गझलसंग्रहाचा प्रकाशन सोहळा शनिवार, ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृह, सरस्वती भुवन महाविद्यालय, निराला बाजार येथे होणार आहे. शब्द, भाव आणि संगीताचा सुरेल संगम घडविणाऱ्या या कार्यक्रमात प्रकाशनासोबतच बहारदार गझलांच्या मैफलीचा आस्वादही रसिकांना घेता येणार आहे.मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशनकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संगीतकार,गझल गायक गझलनवाज भीमराव पांचाळे असतील. ज्येष्ठ गझलकार व समीक्षक प्रमोद खराडे हे गझलसंग्रहावर भाष्य करणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ कवी श्रीधर नांदेडकर उपस्थित राहणार आहेत.'गझलसंगम ' मैफलीमध्ये शब्द-सुरांचा संगमप्रकाशनानंतर ' गझलसंगम ' या विशेष मैफलीत गिरीश जोशी यांच्या निवडक गझलांचे सादरीकरण होणार आहे. गझलेच्या तरल शब्दांना सुरांची साथ लाभणार असून प्रा. गिरीश काळे (बासरी), सारंग अर्धापूरकर (सतार) आणि वैभव बनसोडे (कीबोर्ड) हे साथसंगत करणार आहेत. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ पुस्तक प्रकाशनापुरता मर्यादित न राहता गझलसंगमाचा अविस्मरणीय अनुभव देणारा ठरणार आहे.साहित्यप्रेमींसाठी पर्वणीगझलसंग्रहाचे प्रकाशन, गझलांवरील भाष्य आणि त्यानंतर थेट गझल सादरीकरण अशा त्रिवेणीमुळे हा कार्यक्रम साहित्यप्रेमी आणि गझलरसिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. शब्द, स्वर आणि संवेदनांचा मिलाफ अनुभवण्याची संधी या निमित्ताने रसिकांना मिळणार आहे.आयोजनया कार्यक्रमाचे आयोजन ध्यास गझल साहित्य समूह , न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस यांनी केले आहे. कार्यक्रमाचे निमंत्रक कस्तुरी गिरीश जोशी असून, शहरातील साहित्यिक, सांस्कृतिक आणि कलाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.शेवटमराठी गझलेचा समृद्ध वारसा आणि नव्या पिढीची अभिव्यक्ती यांना जोडणारा हा सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या सांस्कृतिक विश्वातील महत्त्वाचा साहित्यिक कार्यक्रम ठरण्याची अपेक्षा आहे.संपर्कासाठी - ९२२६७५०६२१

## श्री व्यंकटेश पब्लिक स्कूलमध्ये 'ग्रीन डे' उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** श्री तिरुपती शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल भारतमाता कॉलनी, बीडबायपास, छत्रपती संभाजीनगर.या शाळेत आज दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ वार मंगळवार रोजी झाडे लावा झाडे जगवा संदेश देण्यात आला. Green Day साजरा करण्यात आला.याप्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थी ग्रीन ड्रेस, ग्रीन कॅप , घालून आलेत तसेच ग्रीन छत्री आणली. आणि विशेष सर्व विद्यार्थ्यांनी टिफिन मध्ये सर्व ग्रीन व्हेजिटेबल आणली.याप्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक व इतर स्टाफ व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी ग्रीन ड्रेस मध्ये उपस्थित होते.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ ऑगस्ट २०२६


## विधान परिषद आमदार बसवराज पाटील यांचा सत्कार; महात्मा बसवेश्वरांच्या अश्वारूढ स्मारकासाठी निवेदन




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** बसवरत्न पुरस्कार नियोजन समिती, धाराशिव जिल्हा यांच्या वतीने विधान परिषदेवर निवडून आलेले माननीय आमदार *बसवराजजी पाटील* यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उमरगा शहर परिसरात १२व्या शतकातील सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारे, जातिभेद निर्मूलनासाठी कार्य करणारे आद्यक्रांतिकारक *महात्मा बसवेश्वर महाराज* यांचा भव्य अश्वारूढ पुतळा व स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी करणारे निवेदन आमदार पाटील यांना समितीच्या वतीने देण्यात आले.या निवेदनामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा, सामाजिक समता, बंधुता व मानवतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजात रुजावा, तसेच उमरगा शहराच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वैभवात भर पडावी, या उद्देशाने अश्वारूढ स्मारक उभारण्याची मागणी करण्यात आली. आमदार बसवराजजी पाटील यांनी समितीच्या मागणीची सकारात्मक दखल घेत आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.याप्रसंगी जिल्हा बँकेचे अध्यक्ष *मा. बापूरावजी पाटील, बळीराजा पानंद रस्ते योजनेचे सहअध्यक्ष **शरणजी पाटील, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष **मिलिंद लातूरे, भाजप तालुकाध्यक्ष **प्रल्हाद काळे, **डॉ. सचिन विश्वेकर, माजी नगरसेवक **एम. ओ. पाटील, **डॉ. मल्लिकार्जुन खिचडे, माजी जिल्हा परिषद सदस्य **दिलीप भालेराव, **डॉ. दत्तात्रय खलंगारे, नगरसेवक **राजेंद्र पतगे, **मल्लिनाथ दंडगे* यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच बसवरत्न पुरस्कार नियोजन समितीचे अध्यक्ष *सन्नी पाटील, सचिव **शिवकांत पतगे, **बालाजी कुडुंबले, **करण पाटील, **संजय म्हेत्रे, **बालाजी पतगे, **संदीप लिंबाळे* यांच्यासह समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्हॉइस ऑफ मीडियाच्या नवीन कार्यकारणीचा भारतीय जनता किसान मोर्चा जिंतूर च्या वतीने सत्कार



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील बोरी येथे भारतीय जनता किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष शिवाजी उर्फ दिनकर चौधरी आयोजित व्हॉइस ऑफ मेडिया जिंतूर ची नूतन कार्यकारणी बिननिरोध निवड झाल्याबद्दल पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती भाजपा ग्रामीण महिला मोर्चा माजी जिल्हाध्यक्ष डॉ.विद्याताई चौधरी, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती यशवंतराव चौधरी, भाजपा युवा नेते सतीश भाऊ चौधरी ग्रामपंचायत सदस्य पूजाताई शिंपले. भाजप मंडळ अध्यक्ष अशोक शिंपले बोरी प्रेस क्लबचे अध्यक्ष आनंदजी मुरक्या बोरी सोसायटीचे सचिव वामनराव शिंपले बाबुभाई काझी मामू सुधाकर थोरात संदीप इखे सह ज्येष्ठ पत्रकार भास्करराव चौधरी व मार्गदर्शक रामभाऊ ढाकरगे या मान्यवरांची उपस्थिती होती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष म्हणून अमृतराव चौधरी यांनी पदभार स्वीकारला या कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती म्हणून व्हॉइस ऑफ मीडिया जिंतूर कार्यकारणीचे नूतनअध्यक्ष सचिन रायपत्रीवार, सचिव दिलीप देवकर, कार्याध्यक्ष मुंजाजी कंठाळे, उपाध्यक्ष गणेशजी ठाकूर, सहसचिव तुकारामजी सर्जे, सह कोषाध्यक्ष संतोषी तायडे, सदस्य राजू गारकर, शिवानंद कंठाळे, संतोष लहाने, अशोक उकंडे यासह निवड झालेल्या कार्यकारणीचे सत्कार भारतीय जनता किसान मोर्चा तालुकाध्यक्ष दिनकर चौधरी यांच्यासह भारतीय जनता पार्टी बोरी यांच्यावतीने सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दिनकर चौधरी म्हणाले या देशांमध्ये आजतयागत ज्या ज्या क्रांती घडल्या किव्हा घडणार त्या क्रांतीमध्ये सर्वात मोठ पाऊल म्हणजे मीडियाच असते या पत्रकाराच्या आधारेच या देशाची लोकशाही जिवंत आहे व जिवंत राहणारच जोपर्यंत चंद्र सूर्य आहे तोपर्यंत हा पत्रकार माध्यम राहणार आहे त्याचबरोबर त्यांनी निवड झालेल्या पत्रकारांच्या कार्याबद्दल कौतुक करून त्यांनी पत्रकाराणा अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या डॉ.चौधरी म्हणाल्या पत्रकार एक लोकशाहीचा जबाबदार स्तंभ आहे पत्रकार जागरूक राहिला तरच समाज जागा राहील अस त्यांनी मनोगत व्यक्त केले. यशवंतराव चौधरी म्हणाले देशातील व देश बाहेरील सर्व अचूक संदेश आपल्याला सांगणार माध्यम म्हणजे पत्रकारच होयच अशा आपल्या मनोगत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित म्हणून बोरी येथील पत्रकार व व्यापारी व सर्व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गंगाधर(भाऊ) देशमुख रणवीर आंभुरे .दीपक कनकुटे गणेश बुलबुले लोभानभाई पाशाबाई अनिल जैन कैलास चौधरी ज्ञानेश्वर राठोड रामभाऊ चव्हाण हे होते तर आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन कैलास घादगिने यांनी केले

## एक ओंजळ भुकेल्यांशी

मित्रांनो,भूक ही केवळ पोटाची नसते; ती माणुसकीचीही असते. रिकाम्या पोटाला अन्नाची गरज असते, तर एकाकी मनाला प्रेमाची. म्हणूनच "एक ओंजळ भुकेल्यांशी" ही केवळ अन्नदानाची संकल्पना नसून, ती मानवतेच्या जिवंत स्पंदनाची मानवी हाक आहे.आपल्या आजूबाजूला अनेक कुटुंबे अशी आहेत, ज्यांना दिवसातून दोन वेळचे अन्न मिळणेही कठीण होते.रस्त्यावरची मुले, निराधार वृद्ध, मजूर, बेघर आणि संकटग्रस्त कुटुंबे भुकेशी दररोज संघर्ष करत असतात.अशा वेळी आपण दिलेली एक ओंजळ अन्नाची त्यांच्यासाठी जीवनाची नवी आशा निर्माण होऊ शकते.भारतीय संस्कृतीने नेहमीच "अन्न हे पूर्णब्रह्म" मानले आहे. आपल्या ताटातील एक घास जर आपण गरजू व्यक्तीसाठी राखून ठेवला, तर त्यातून केवळ भूक भागत नाही; तर समाजात विश्वास, प्रेम आणि बंधुभावही वाढतो. अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते, कारण ते थेट जीवनाशी जोडलेले आहे.आज समाजात विकासाच्या मोठमोठ्या घोषणा होत आहेत. उंच इमारती उभ्या राहत आहेत, आधुनिक तंत्रज्ञान झपाट्याने पुढे जात आहे; पण जर आपल्या गावात, शहरात किंवा देशात एखादा माणूस उपाशी झोपत असेल, तर त्या विकासाला मानवी चेहरा उरत नाही. खरी प्रगती तीच, जिथे कोणाच्याही डोळ्यात भुकेचे अश्रू नसतील.प्रत्येक सण, वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस किंवा आनंदाचा क्षण आपण गरजूंसोबत अन्न वाटून साजरा करू शकतो. आपल्या घरातील उरलेले अन्न वाया घालवण्याऐवजी ते सुरक्षितपणे गरजूंपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आपण स्वीकारली, तर अनेकांचे पोट भरू शकते. ही जबाबदारी केवळ सरकारची नाही; ती प्रत्येक संवेदनशील नागरिकाची आहे.मानवतेचा धर्म कोणताही नसतो. भुकेला माणूस जात, धर्म, भाषा किंवा प्रदेश विचारत नाही. त्याला फक्त दोन घास अन्न आणि मायेचा हात हवा असतो. म्हणूनच "एक ओंजळ भुकेल्यांशी" हा उपक्रम सामाजिक समतेचा, बंधुत्वाचा आणि मानवतेचा उत्सव बनला पाहिजे.आज गरज आहे ती दानशूर मनांची, संवेदनशील विचारांची आणि कृतीशील हातांची. आपण प्रत्येकाने दररोज एक ओंजळ अन्न, थोडा वेळ किंवा थोडे प्रेम गरजूंसाठी दिले, तर हजारो आयुष्यांमध्ये आशेचा प्रकाश निर्माण होईल.चला, आज एक संकल्प करूया— कोणीही आपल्या परिसरात उपाशी झोपू नये. आपल्या ताटातील एक घास, आपल्या मनातील एक भावना आणि आपल्या हातातील एक ओंजळ मानवतेसाठी अर्पण करूया."एक ओंजळ भुकेल्यांशी म्हणजे केवळ अन्नदान नाही, तर माणसाने माणसासाठी जगण्याचा सर्वात सुंदर संस्कार आहे.


**लेखक :-भूमिपुत्र वाघ**
**www.samajvikassanstha.org**
9172962482



### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ ऑगस्ट २०२६


## सर्वोत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांची अहिल्यानगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अंतिम फेरीसाठी निवड




**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न संस्था 'बालरंगभूमी परिषद' महाराष्ट्राचा दैदिप्यमान इतिहास पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि बालदोस्तांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. महाराष्ट्राच्या मातीला शौर्याचा, त्यागाचा आणि सुशासनाचा मोठा वारसा लाभला आहे. परिषदेतर्फे महाराष्ट्राचा इतिहास हा उपक्रम राबवला जात आहे आणि या विशेष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षीचा विषय लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर होता. आपल्या प्रजाहितदक्ष कारभाराने आणि दातृत्वाने अवघ्या भारताला दिशा देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या अद्वितीय जीवन प्रवासावर आधारित एकपात्री, नाट्यछटा, स्वगत, नाटिका सादरीकरण बाल कलाकारांनी केले. प्राथमिक फेरी दि. 2 ऑगस्ट 2026, रोजी रविवार सकाळ 9:30 वाजता मित्र भा. बा. आर्वीकर सभागृह, जीवन विकास ग्रंथालय, टिळक नगर, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी संपन्न झाली. या महोत्सवात सर्व सहभागी कलाकारांना प्रशस्तीपत्र आणि पुष्प देऊन त्यांचे स्वागत केले. या महोत्सवाची अंतिम फेरी: दि. 9 ऑगस्ट 2026, माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे होणार आहे. तसेच सर्वोत्कृष्ट सादरीकरण ठरलेल्या बालकलाकाराची व संघाची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली . मोठा गट सर्वोत्कृष्ट वीरा चांदोडकर, उत्कृष्ट पारितोषिक स्वरा उमेश साळवे आणि उत्तम पारितोषिक श्रावणी विनोद कुमार पाटील यांना पारितोषिक देण्यात आले छोटा गट- सर्वोत्कृष्ट गार्गी नरेंद्र मानकर, उत्कृष्ट अभिधा अर्चना पोहनेरकर आणि उत्तम स्वरा सुजय धर्माधिकारी यांना पारितोषिक देण्यात आले तर सांघिक शारदा मंदिर कन्या शाळा या शाळेला सर्वोत्कृष्ट देण्यात आले. कार्यक्रमाचे स्पर्धेचे परीक्षण प्रा. रमेश धोंडगे व राहुल काकडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक छत्रपती संभाजीनगर शाखेचे जिल्हाध्यक्ष आसेफ शेख यांनी केले सूत्रसंचालन प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष (प्रशासन) प्राचार्य हसन इनामदार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कोषाध्यक्ष विनोद आघाव सहकार्य व अर्चना देवधर कार्यकारिणी सदस्य लक्ष्मण अहिरे, रमेश सोळुंके, श्रीपाद पदे, मराठवाडा युवा संघटक अभिजीत भातलौंढे, ओम बेलेकर यांनी परिश्रम घेतले.

## मुंबईच्या १६ एकर जमिनीवरून आदित्य ठाकरेंचा गंभीर आरोप



**मुंबई :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील मोकळ्या जागांच्या कथित वाटपावरून राज्य सरकार आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबईतील मोकळ्या जागा आपल्या पक्षाशी संबंधित व्यक्तींना देण्याचा भाजपचा "विचित्र हट्ट" असल्याचा आरोप करत त्यांनी हा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच, हा निर्णय मागे न घेतल्यास मुंबईकरांसह रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

**नेमके काय आहे प्रकरण?**

मुंबईतील वांद्रे-पूर्व येथील एमएमआरडीए मैदान परिसरातील सुमारे १६ एकर जागा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला (MCA) दीर्घकालीन भाडेपट्ट्यावर देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावरून हा वाद निर्माण झाला आहे. या प्रस्तावामध्ये सध्या नागरिकांसाठी खुल्या असलेल्या क्रिकेट मैदानासह म्हाडाच्या दोन भूखंडांचाही समावेश असल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम आणि संबंधित क्रीडा सुविधा उभारण्याचा प्रस्ताव असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, विरोधकांचा आरोप आहे की यामुळे मुंबईतील मोकळ्या सार्वजनिक जागा कमी होतील.

आदित्य ठाकरे यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, मुंबईतील निवडणुका लढवण्यामागचा भाजपचा उद्देश शहरातील मोकळ्या जागांवर ताबा मिळवणे आणि त्या आपल्या लोकांना देणे हाच आहे.

त्यांनी आरोप केला की, मुंबईतील एकमेव कृत्रिम टर्फ असलेले फुटबॉल मैदान पाडून तेथे कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याचा आणि त्याला भाजपच्या एका नेत्याचे नाव देण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यानंतर आता आणखी १६ एकर जमीन भाजपशी संबंधित व्यक्तीला देण्यात आली आहे, असा दावाही त्यांनी केला.

मुंबईतील मोकळ्या मोक्याच्या जागा बळकावणे आणि त्या आपल्याच माणसांच्या घशात घालणे, ह्याचं भाजपला एक अजबच खूळ लागलं आहे. ह्यासाठीच ते मुंबईत निवडणुका लढवतात. एकीकडे कॉन्व्हेन्शन सेंटरसाठी मुंबईतील एकमेव आर्टिफिशियल टर्फ फुटबॉलचे मैदान बळकावून त्याला त्यांच्या एका नेत्याचे नाव देण्याव्यतिरिक्त, त्यांनी आणखी 16 एकर जागा... तब्बल 16 एकर जागा त्यांच्याच पक्षाच्या दुसऱ्या ए सदस्याला भेट म्हणून दिली आहे! ह्यातलं एक क्रिकेट मैदान, जे आम्ही आमच्या कार्यकाळात सर्व मुंबईकरांना खेळण्यासाठी बनवलं होतं आणि म्हाडाचे 2 भूखंड जे फुकट दिले जातील. आम्ही ह्याला विरोध करू आणि भाजप राजवटीच्या ह्या उघड-उघड जमीन हडपण्याच्या प्रवृत्तीविरोधात सर्व मुंबईकरांना रस्त्यावर उतरण्याचे आवाहन करू. त्यांना मुंबईकरांकडून मोकळ्या जागा हिरावून घ्यायच्या आहेत आणि त्या आपल्याच माणसांच्या स्वाधीन करायच्या आहेत. हे अशाप्रकारचे वाटप मुख्यमंत्र्यांनी तात्काळ रद्द केली पाहिजेत. पण मला वाटतं ते असं करणार नाहीत, कारण अशाप्रकारे जमीन बळकावून त्यांच्या पक्षाचाही फायदा होणार आहे... मुंबईचे नुकसान आणि स्वतःचा फायदा! या निर्णयाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून तीव्र विरोध केला जाईल, असे सांगत आदित्य ठाकरे यांनी मुंबईकरांना रस्त्यावर उतरून या कथित जमीन वाटपाविरोधात आंदोलन करण्याचे आवाहन केले.

## सुनेत्रा पवार प्रकरणावर फडणवीस-शिंदे आक्रमक

**मुंबई :** राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसने सोशल मीडियावर केलेल्या 'गुंगी गुडिया' या टिप्पणीवरून राज्यातील राजकारण चांगलेच पेटले आहे. या वक्तव्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत समाचार घेत काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत इतक्या खालच्या स्तराला जाणारे हे आता आपल्याला पहिल्यांदाच पहायला मिळत असल्याची प्रतिक्रिया फडणवीसांनी दिली आहे. तर महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांचा अपमान म्हणजे महाराष्ट्रातील तमाम माता-भगिनींचा आणि लाडक्या बहिणींचा अपमान, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावर प्रतिक्रिया देताना म्हणाले, मला असे वाटते की अतिशय खालच्या स्तरावर हे उतरले आहेत. मुळात यांना कुठलाही रिस्पॉन्स मिळत नाही, कोणी विचारात नाही, त्यामुळे न्यूजमध्ये येण्यासाठी अशा पद्धतीचे काम चालले आहे. 'बदनाम हुए तो क्या हुआ, नाम तो हुआ', अशा पद्धतीने यांची कारवाई सुरू आहे. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत इतक्या खालच्या स्तराला जाणारे हे आपल्याला पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे, अशी टीका फडणवीस यांनी केली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर बोलताना तीव्र संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांचा अपमान म्हणजे महाराष्ट्रातील तमाम माता-भगिनींचा आणि लाडक्या बहिणींचा अपमान आहे. महिलांच्या सन्मानाच्या नावाने राजकारण करणाऱ्या काँग्रेसचा आज खरा चेहरा महाराष्ट्राने पाहिला आहे. राजकीय विरोध करा, पण महिलांचा अपमान करून राजकारण करण्याची ही काँग्रेसची संस्कृती आहे का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, सुनेत्रा पवार यांच्यावर टीका करण्याच्या नादात काँग्रेसने संपूर्ण महिला शक्तीचाच अवमान केला आहे. हा अपमान महाराष्ट्रातील स्वाभिमानी महिला कधीही विसरणार नाहीत. महिलांचा सन्मान करणाऱ्या महाराष्ट्रात अशा प्रकारची भाषा कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही.

यावेळी एकनाथ शिंदे यांनी 'लाडकी बहीण' योजनेचाही उल्लेख करत काँग्रेसवर निशाणा साधला. २०२४ मध्ये महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींनी काँग्रेसला लोकशाही मार्गाने उत्तर दिले होते. महिलांचा अपमान करणाऱ्यांना पुन्हा एकदा जनताच धडा शिकवेल, असा इशाराही त्यांनी दिला. काँग्रेसने राजकीय विरोध करताना सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या असून, महिलांचा अपमान करणारी भाषा महाराष्ट्र कधीही स्वीकारणार नाही, असेही शिंदे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ ऑगस्ट २०२६


# जेन झी चा एल्गार आणि 'आयडिया ऑफ इंडिया'चे पुनर्प्रज्वलीकरण



जंतर-मंतरवर तब्बल ३६ दिवस प्रचंड उकाड्याच्या वातावरणात चाललेल्या ठिय्या आंदोलनानंतर अखेर "यंग कॉकरोचेस" नी आपला ऐतिहासिक विजय मिळवला. सार्वजनिक टीकेला न जुमानणाऱ्या आणि कठोर निर्णयांसाठी ओळखल्या जाणाऱ्या सत्ताधीशांना अखेर नमावेच लागले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह आंदोलकांच्या प्रमुख मागण्या सरकारने मान्य केल्या. मोदी सरकारच्या कार्यकाळात एखाद्या सामाजिक चळवळीने सरकारला माघार घ्यायला लावण्याची ही केवळ दुसरी वेळ आहे. यापूर्वी २०२०-२१ मध्ये वर्षभर चाललेल्या ऐतिहासिक शेतकरी आंदोलनानंतर तीन कृषी कायदे मागे घेण्यात आले होते; मात्र, एवढ्या मोठ्या आंदोलना दरम्यान एकाही केंद्रीय मंत्र्याला पद सोडावे लागले नव्हते. उत्तरदायित्वाची परंपरा आणि नवा राजकीय पायंडा लोकशाहीत सरकार हे जनतेला उत्तरदायी असणे हीच मूलभूत अपेक्षा असते. गैरव्यवस्थापन किंवा भ्रष्टाचाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून मंत्र्यांनी राजीनामे देणे भारतासाठी नवीन नाही. भूतकाळात रेल्वे अपघातांसारख्या दुर्घटनांनंतर अनेक मंत्र्यांनी नैतिकतेच्या मुद्द्यावर राजीनामे दिल्याचे किंवा त्यांना ते देणे भाग पडल्याचे इतिहास सांगतो. मात्र, गेल्या बारा वर्षांपासून केंद्र सरकार एका वेगळ्याच साच्यानुसार काम करत आहे. नव्या राजकीय कार्यपद्धतीचा (टेंप्लेट) उदय झाला. पक्षाच्या अजेंड्याची अंमलबजावणी करणारा, कोणत्याही टीकेपुढे न झुकणारा 'शक्तिशाली' नेता ही प्रतिमा केंद्रस्थानी आणली गेली. या प्रवासात विद्यमान लोकशाही संकेत आणि घटनात्मक मूल्यांकडे अनेकदा दुर्लक्ष झाले. राजकीय जनमत तयार करण्याची त्यांची रणनीती ही आधीपासून अस्तित्वात असलेल्या, विशेषत:धर्म आणि जातीभेदांचा निर्लज्जपणे गैरफायदा घेण्याभोवती फिरत राहिली. 'आयडिया ऑफ इंडिया'ला नवा उजाळा २०२६ च्या उन्हाळ्यात पेटलेला 'जनरेशन झेड'चा (जेन-झी पिढी) हा लढा जरी त्यांच्या तात्कालिक मागण्यांशी निगडित असला, तरी भारतीय प्रजासत्ताकाच्या भविष्यावर त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. अवघ्या पाच आठवड्यांत या तरुणाईने आपल्या राष्ट्रनिर्मात्यांची 'आयडिया ऑफ इंडिया' पुन्हा जिवंत केली. ज्यात डॉ. आंबेडकरांचा घटनावाद, महात्मा गांधींचा सर्वधर्मसमभाव आणि पंडित नेहरूंनी दिलेली धर्मनिरपेक्षतेची जोड स्पष्टपणे दिसून आली. सामान्यतः भारतातील जनआंदोलने आणि राजकीय समीकरणांचे विश्लेषण जात, धर्म, प्रदेश किंवा वर्गाच्या चौकटीतून केले जाते. मात्र, जेन-झी पिढीच्या या आंदोलनाने या सर्व पारंपरिक भिंतींना सुरुंग लावला. अस्मितांचे अस्तित्व नक्कीच होते, पण आंदोलनाच्या ध्येयापुढे त्या पूर्णपणे दुय्यम ठरल्या. या आंदोलनाची धुरा सांभाळणारे अभिजित दीपके हे महाराष्ट्रातील दलित पार्श्वभूमीचे तरुण आहेत; पण डिजिटल प्लॅटफॉर्मवर असो वा प्रत्यक्ष आंदोलनात, या ओळखीला कोणीही महत्त्व दिले नाही. आंदोलनाचा दुसरा महत्त्वाचा चेहरा ठरलेले सोनम वांगचुक हेदेखील भौगोलिक आणि राजकीय दृष्ट्या परिघावरील भागातून आले होते. त्यांच्या अनिश्चितकालीन उपोषणाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्यासोबत उपोषणाला बसलेले दिल्लीतील डाव्या विचारांचे विद्यार्थी होते, पण त्यांनी मार्क्स किंवा माओची चित्रे दाखवून वैचारिक चौकटी लादण्याचा प्रयत्न केला नाही. महिलांचा निडर सहभाग आणि स्वातंत्र्याचा नवा अवकाश या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तरुण महिलांचा उत्स्फूर्त आणि सक्रिय सहभाग. कोणत्याही राजकीय किंवा विद्यार्थी संघटनेची पार्श्वभूमी नसताना या मुली स्वयंप्रेरणेने आंदोलनात उतरल्या आणि रात्रंदिवस तिथे थांबल्या. २० जुलै रोजी झालेल्या पोलिसांच्या तीव्र लाठीहल्ल्यात अनेक तरुणी गंभीर जखमी झाल्या. कुटुंबाशी संघर्ष करत, समाजाचे नियम मोडीत काढत ही तरुणाई रस्त्यावर आली होती. जंतर-मंतरवरील बहुतांश तरुण हे शहरी मध्यमवर्गीय कुटुंबातील होते. ज्यांच्या पालकांनी बहुसंख्येने सत्ताधारी पक्षाला मतदान केले होते. पालकांना न सांगता आंदोलनात सामील झालेल्या या तरुणांमध्ये, आपली ही भूमिका पालकांना कळेल याची कोणतीही भीती किंवा चिंता नव्हती. या आंदोलनात स्त्रिया केवळ 'दिसण्यापुरत्या' किंवा संख्येचे प्रमाण वाढवण्यासाठी नव्हत्या; त्यांनी आपला प्रभाव स्पष्टपणे पाडला. त्यांच्या हातातील प्रक्षोभक आणि विचार करायला लावणारे पोस्टर्स केवळ राजवटीवरच नव्हे, तर पुरुषप्रधान मानसिकतेवरही थेट प्रहार करत होते. शॉर्ट्ससारखे कम्फर्टेबल कपडे घालून आलेल्या तरुणींना तिथे कोणत्याही प्रकारच्या असुरक्षिततेचा सामना करावा लागला नाही. गर्दीच्या ठिकाणी महिलांना होणाऱ्या त्रासापासून पूर्णपणे मुक्त, स्वातंत्र्याचा एक नवा आणि सुरक्षित अवकाश या आंदोलनाने निर्माण केला होता. बदलाची नांदी आणि भविष्याची दिशा दमट हवामानात, रस्त्यावर झोपून दिवस काढणे सोपे नव्हते. विशेषतः ज्यांनी कधीच कष्ट अनुभवले नाहीत त्यांच्यासाठी हे कठीण होते. तरीही, या संघर्षात एक वेगळाच आनंद आणि राजकीय सामाजीकरणाचा धडा दडला होता. सामाजिक चळवळी या केवळ 'असण्याचे' नव्हे, तर 'घडण्याचे' क्षण असतात. भिन्न भिन्न सामाजिक पार्श्वभूमीच्या तरुणांचे हे एकत्र येणे म्हणजे आंबेडकर, गांधी आणि नेहरू यांच्या दूरदृष्टीशी सुसंगत असलेल्या एका नव्या राष्ट्रीय राजकारणाची नांदी आहे. डॉ. आंबेडकरांचे विचार इथे अधिक ठळकपणे जाणवले, कारण ते घटनात्मक लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. त्याचबरोबर, 'हिंदू-मुस्लिम' धार्मिक द्वेषाला राजकीय हत्यार बनवणाऱ्या राजकारणाला या पिढीने दिलेला नकार अत्यंत निर्णायक होता. अर्थात, हा एक 'महत्त्वाचा क्षण' होता, संपूर्ण 'सामाजिक क्रांती' नव्हे. एका मंत्र्याच्या राजीनाम्याने देशातील जर्जर झालेली शिक्षण व्यवस्था एका रात्रीत बदलणार नाही. त्यासाठी भागधारक, संस्था आणि विद्यार्थी यांच्याशी लोकशाही मार्गाने संवाद साधून व्यवस्थेत विकेंद्रीकरण आणणे आवश्यक आहे. पुन्हा एखादा नवीन "कडक" कायदा आणून अधिकारांचे केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. परंतु, जेन-झी पिढीने लोकशाहीत जो नवा राजकीय अवकाश मिळवून दिला आहे, त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भविष्यातील अन्यायाविरुद्धच्या लढ्याला एक नवीन दिशा आणि ऊर्जा देण्याचे काम या आंदोलनाने केले आहे.


**भाषांतर : प्रा.प्रियदर्शन भवरे, समाजशास्त्र विभाग, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.**

**लेखक : सुरिंदर एस जोधका, निवृत्त प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, जेएनयू , नवी दिल्ली.**


# धुळे तालुक्यात म्हशीला तलावातून बाहेर काढताना शेतकरी-गुराखी बुडाला : म्हैस वाचली, निमडाळे तलावावरील घटनेत दोघांचा मृत्यू



**धुळे** : तलावातून म्हशीला बाहेर काढण्यासाठी पाण्यात उतरल्यावर बुडणाऱ्या वृद्ध शेतकऱ्याचा आणि त्यांना वाचवण्यासाठी पाण्यात उडी घेतलेला गुराखी अशा दोघांचा तलावात बुडून मृत्यू झाला. तर आणखी एक व्यक्ती बालंबाल बचावला. या घटनेत म्हैस स्वत:हून पाण्यातून बाहेर आली. घटना रविवारी संध्याकाळी धुळे शहराजवळील निमडाळे शिवारात घडली. बापू पांडुरंग पाटील (65) व दशरथ नाना मोरे (38) अशी मृतांची नावे आहेत. जोरदार पावसामुळे धुळ्याजवळील निमडाळे शिवारातील तलाव पूर्ण भरला आहे. रविवारी बापू पाटील (65) म्हशी घेऊन तलावावर गेले होते. यातील एका म्हशीला बाहेर काढण्यासाठी ते तलावात उतरले. पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडू लागले. त्यांना वाचवण्यासाठी दशरथ मोरे यांनी पाण्यात उडी घेतली होती. तिसरी व्यक्ती वेळीच सावध म्हशीला तलावातून बाहेर काढण्यासाठी शेतकरी बापू पाटील तलावात उतरले. मात्र ते पाण्यात गटांगळ्या खाऊ लागले. त्यांना पाहून दशरथ मोरे व अन्य एकाने उडी घेतली. मात्रपाटील आणि मोरे दोघे पाण्यात दिसेनासे झाले. तर तिसऱ्या व्यक्तीने अधिक पुढे न जाता काठावर येऊन जीव वाचवला. विशेष म्हणजे पाटील व मोरे दोघांनाही पोहता येत होते.